LOKNETE. DR. BALASAHEB VIKHE PATIL
(PADMA BHUSHAN AWARDEE)
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY
PRAVARA RURAL ENGINEERING COLLEGE
LONI

PERIODICAL

Our Founder

Late. Padmashri Dr. Vitthalrao Vikhe Patil

(1901 - 1980)

Our Inspiration

Late. Padmabhushan Dr. Balasaheb Vikhe Patil

(1932 - 2016)

Our Staunch Support

Namdar Shri. Radhakrishna Vikhe Patil

Member of Maharashtra Legislative Assembly,
Chairman, PRES.

Our Staunch Support

Sau. Shalinitai Vikhe Patil

Ex - President,
Zilla Parishad, Ahmednagar.

The Patrons - Their support is our driving force

Dr. Rajendra Vikhe Patil

Pravara Institute of Medical Sciences, Loni.

Dr. Sujay Vikhe Patil

Member of Parliament.

Our Mentor



Dr. Y. S. P. Thorat

Director General,
Pravara Rural Education Society, Loni.

Article written by Dr. Y. S. P. Thorat, Director General, Pravara Rural Education Society, Loni have been published in the Marathi newspaper Sakal (under Saptrang).

- Sixth article published on Sunday, 05th April 2020.

देखना है ज़ोर कितना बाज़ू-ए-कातिल में है... (डॉ. यशवंत थोरात)

डॉ. यशवंत थोरात | रविवार, 5 एप्रिल 2020

A+ A-

आपल्या भारताची संस्कृती प्राचीन आहे. आजवर आपल्यावर अनेक संकटं आली आणि गेली. आता हे नवं संकट आलं आहे; पण खात्री बाळगा, तेही जाईल. मुद्दा तो नाही. मुद्दा हा आहे की हे नवं संकट आपल्याला नैतिकदृष्ट्या सबळ बनवणार की दुर्बल?





देखना है ज़ोर कितना
बाज़ू-ए-कातिल में है...

आपल्या भारताची संस्कृती प्राचीन आहे. आजवर आपल्यावर अनेक संकटं आली आणि गेली. आता हे नवं संकट आलं आहे; पण खात्री बाळगा, तेही जाईल. मुद्दा तो नाही. मुद्दा हा आहे की हे नवं संकट आपल्याला नैतिकदृष्ट्या सबळ बनवणार की दुर्बल?

'राजीव गांधी ट्रस्ट'च्या महिला सबलीकरणाच्या प्रमुख प्रकल्पाच्या पाहणीसाठी ते अमेठीला आले होते. 'कुटुंबा'शी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते आणि त्यांचा हा दौरा खासगी होता. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून या प्रकल्पाला काय मदत होऊ शकते हे पाहणं हा या दौऱ्याचा उद्देश होता.
आम्ही बसलो होतो ती खोली थोडी अंधारीच होती. एसी पूर्ण क्षमतेनं सुरू असला तरी त्याचा परिणाम फारसा जाणवत नव्हता. पाहुणे आणि राहुल एका सोफ्यावर बसले होते. बाकी आम्ही सगळे जागा मिळेल तिथं बसलो होतो. या प्रकल्पाविषयीच्या शंका दूर करण्याची त्यांच्या टीमला ही अखेरची संधी होती. या मीटिंगनंतर टीम त्यांच्याबरोबर मायदेशी परतणार होती.

दौऱ्याची सुरुवात दुर्दैवीच झाली.

पहिली गोष्ट म्हणजे, ते अगदी भर उन्हाळ्यात अमेठीला आले होते. त्या दिवशी तारीख होती १० मे २०१०.
दुसरी गोष्ट म्हणजे, त्यांच्या व्यक्तिगत सुरक्षा अधिकाऱ्यांनी आदल्या दिवशी सुरक्षाव्यवस्थेची पाहणी केली होती. ही व्यवस्था बरोबर नाही असं त्यांचं मत होतं. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. 'आम्हाला आमची जबाबदारी कळत नाही का?' इथपासून ते 'आम्हाला सांगणारे ते कोण?' इथपर्यंत प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. आमची प्रतिष्ठा आणि परंपरागत अगत्य यावर हा ठपका होता. कुठलीच बाजू माघार घ्यायला तयार नव्हती. पोलिस अधीक्षकांनी ट्रस्टचा मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्यानं माझा सल्ला मागितला.
"सुरक्षेची दोन कडी ठेवायला काय हरकत आहे?" मी सुचवलं : "एक कडं परदेशी पोलिसांचं, तर दुसरं कडं उत्तर प्रदेश पोलिसांचं असावं."
"लाजवाब, सर. एक्स्पीरिअन्स इस को कहते है. साप भी मर गया और लाठी भी नही टूटी!" पोलिस अधीक्षक म्हणाले.
अमेठीत उतरल्याबरोबर त्यांनी सगळे सोपस्कार बाजूला ठेवले आणि राहुल यांना विचारलं : "तुमचा चीफ ऑफ स्टाफ कोण आहे?" माझी त्यांच्याशी औपचारिक ओळख करून देण्यात आली.
"सर्व तयारी झालीय का?" त्यांनी विचारलं.
"हो," मी म्हणालो.
"मग ते रद्द करून टाका," ते म्हणाले.
"जिथं भेटीची रंगीत तालीम झालेली आहे अशा ठिकाणी जाण्यात काय अर्थ आहे?"
हे ठरवणारे ते कोण, असं मनातल्या मनात म्हणत मी त्यांच्या समोरच्या टेबलावर हातातले कागद पसरले व मी म्हणालो : "हवं ते गाव निवडा. आम्ही ज्या गावांत काम करतो ती सगळी गावं सारखीच आहेत. आणि माफ करा सर, आम्हाला रंगीत तालीम करण्याची सवय नाही!"
त्यांच्या डोळ्यांत आदराची भावना झळकली. त्यांनी ते कागद उलटेपालटे करून पाहिले. गावांच्या नावांवरून नजर फिरवली आणि यादीतल्या एका नावावर बोट ठेवून ते म्हणाले : "थोरात, आपण या गावी जाऊ या."
आम्ही त्या गावाला निघालो.
***

उत्तर प्रदेशातल्या पूर्व भागातला उन्हाळा अगदी जीवघेणा असतो; पण त्यांच्या वातानुकूलित, बुलेटप्रूफ लँडरोव्हरमध्ये तंत्रज्ञानानं निसर्गाचे नियम बदलले होते. माझा रक्तदाब हळूहळू स्थिरावायला लागला. ग्रामीण भागातल्या रस्त्यावरून आमची गाडी जात होती. मी सहजच त्यांच्याकडे बघितलं. उंच आणि सडपातळ. पोरगेलेसे म्हणता येतील असे. डोळ्यांत कुतूहल आणि कपाळावर रुळणारे केस 'मेरे महबूब'मधल्या साधनाची आठवण देणारे! त्यांनी अनेक प्रश्न विचारले. काही मला, तर काही राहुल यांना...'या भागात तुम्ही ३ लाख ४२ हजार कुटुंबांपर्यंत कसे पोचलात? महिलागट तयार करण्याची तुमची पद्धत कोणती? बांधलेले महिला बचतगट पक्के आहेत की नाहीत? त्यांच्याकडून बचत केली जाते का? बँकांकडून त्यांना कर्ज मिळतंय का? बँका या योजनेत सहभागी होत आहेत का? या भागातली आरोग्याची व शिक्षणाची स्थिती कशी आहे? तुम्हाला ज्या बाबतीत आर्थिक मदतीची गरज भासू शकेल अशा तिथं आणखी काय काय कमतरता आहेत...?'
***

आम्ही तिथं पोचलो तेव्हा दुपार कलली होती. अपेक्षेप्रमाणे गावात कमालीची शांतता होती.
"त्यांना ग्रामसभेत लोकांशी बोलायचं आहे," असं त्यांच्या दुभाषी बाईंनी अमेरिकी हिंदीत मला सांगितलं.
कदाचित मी इंग्लिश बोलू शकेन की नाही अशी शंका त्यांना माझ्या भारतीय पोशाखामुळे आली असावी.
"त्याला वेळ लागेल. त्यांना थोडा आराम करायला सांगा," मी अस्खलित इंग्लिशमध्ये बाईंना सांगितलं.
त्यांनी भुवया उंचावल्या.
"इथं किती उकडतंय," बाई म्हणाल्या.
"उकडतंय? मला नाही तसं वाटत," मी म्हणालो.
सामना भारताच्या बाजूनं झुकला होता!
***

प्रामुख्यानं दलित वस्ती असलेलं ते गाव होतं. स्वच्छ; पण गरीब. बहुतेक लोक कामावर गेलेले होते. गावातल्या महिला आणि मुलं लिंबाच्या एका झाडाखाली जमली होती. राहुल यांना पाहताच सरपंच लगबगीनं उठले. त्यांनी माईक ताब्यात घेतला.
"थांबा, मीच त्यांची ओळख करून देते," दुभाषी बाई म्हणाल्या. सरपंच खाली बसले. राहुल यांनी स्वागत केलं आणि बाईंनी पाहुण्यांची ओळख करून दिली.
'आपले पाहुणे म्हणजे जगातली सर्वात श्रीमंत व्यक्ती बिल गेट्स आहेत' असं त्या म्हणाल्या असत्या तर लोकांना अर्थ स्पष्ट समजला असता; पण संस्कृतप्रचुर हिंदीत त्यांनी बिल गेट्स यांचं कार्यकर्तृत्व सांगितलं. भाषण लोकांच्या डोक्यावरून गेलं. बायका जांभया देत होत्या. माश्या घोंघावत होत्या. मुलं कंटाळून रडत होती. त्यांच्या चेहऱ्यांवर कंटाळा स्पष्ट दिसत होता; पण ती दुभाषी बाई आपली हार मानायला तयार नव्हत्या. त्यांचं सुरूच होतं... 'तुम्ही यांच्याविषयी ऐकलंच असेल...'
समोरच्यांच्या चेहऱ्यावरची रेषाही हलत नव्हती.
ज्या फाउंडेशनकडून मदतनिधी मिळवायचा आहे त्या फाउंडेशनच्या कार्यक्रमाची सुरुवातच जर अशी झाली तर त्याची सांगता कशा प्रकारची असेल या काळजीत मी पडलो!
दुभाषी बाईंचं भाषण संपण्यापूर्वी बिल गेट्स माझ्याकडे पाहत मला म्हणाले : "मी त्यांच्यासाठी काय करू शकतो हे त्या महिलांना विचारा..."
मी उठलो आणि त्या महिलांना संबोधित करत म्हणालो : "ये जानना चाहते है की आप लोगों को किस तरह की सुविधाएँ चाहिए? आप के लिए ये क्या कर सकते है?"
समोरच्या बायकांचे चेहरे एकदम हलले, डोळे लकाकले. फाटके कपडे घातलेली एक मध्यमवयीन महिला छोट्या मुलाला कडेवर घेऊन उठून उभी राहिली आणि सुस्पष्ट आवाजात म्हणाली : "आमच्या मुलांना इंग्लिशचं चांगलं शिक्षण मिळेल अशी सुविधा द्या असं त्यांना सांगा."
तिच्या आवाजात आत्मविश्वास होता. तिचं ते वाक्य बिल गेट्स यांच्या मनाला स्पर्शून गेलं असावं.
***

परतताना त्यांनी आमच्या प्रकल्पाविषयी खूप उत्सुकता दाखवली.
'बचतगटाच्या माध्यमातून शिक्षणाचा दर्जा सुधारेल का? ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्याच्या सोई कशा आणि किती आहेत? या भागात साथीचे आणि सर्वसाधारण आजार कुठले आहेत? मुलांना नियमितपणे लसटोचणी होते का? माध्यान्हभोजन देण्याचा कार्यक्रम ठीक चालला आहे का? असे एक ना अनेक प्रश्न
त्यांनी विचारले.
आमच्या कामामुळे या भागात सावकारी कर्जाचं प्रमाण कमी झालं होतं आणि पंचायतींवर निवडून आलेल्या महिलांची संख्या वाढली होती
हे ऐकून ते खूप प्रभावित झाले.
आमची मोटार एका राष्ट्रीयीकृत बँकेच्या जवळून चालली होती. माझं लक्ष तिकडे वेधत त्यांनी विचारलं : "डॉ. थोरात, ही ग्रामीण बँक आहे का?"
"होय. एका मोठ्या बँकेची शाखा आहे," मी म्हणालो.
"आपल्याला ही बँक पाहता येईल का?" त्यांनी विचारलं.
"तुम्ही सुरक्षारक्षकांची परवानगी घेतली आहे का?" मी म्हणालो.

त्यावर गमतीदार शेरेबाजी करत ते प्रसन्नपणे हसले.

आमच्या मोटारींचा ताफा बँकेजवळ थांबला.

सुरक्षारक्षकांनी बँकेला गराडा घालत पोझिशन्स घेतल्या. काहीतरी घडलंय असं वाटून बघ्यांनी गर्दी केली.

आम्ही दोघं आणि एक अधिकारी असे तिघं आत गेलो. बँक मॅनेजर फायलीत डोकं खुपसून बसले होते. बाहेर काय चाललंय किंवा कुणी मोठा परदेशी पाहुणा आपल्याला भेटायला आलाय याचा त्यांना पत्ताच नव्हता. एका हातात पेन आणि दुसऱ्या हातात व्हाउचर्स घेऊन ते लेजरमधल्या नोंदी तपासत होते.

त्यांचं लक्ष वेधून घेण्यासाठी मी 'माफ कीजिए' असं म्हणत बोलायला सुरुवात केली. मानही वर न करता त्यांनी आम्हाला बसण्याची खूण हातानंच केली. मी पुन्हा म्हणालो, 'माफ कीजिए...' त्याच सुरात सूर मिसळून वर न बघता ते म्हणाले, 'कर दिया माफ. बैठिए'.

हतबल होऊन मी शांत बसलो. दोन-चार मिनिटं अशीच गेली. नंतर फायलीतून डोकं वर काढत आणि शांतपणे आमच्याकडे बघत सफाईदार उर्दूत मॅनेजरसाहेब म्हणाले : "फर्माईए, मै आप की क्या खिदमत कर सकता हूँ? अकाउंट खोलना है क्या?"

"नही, नहीं" मी गडबडीनं म्हणालो.

बिल गेट्स यांच्याकडे निर्देश करत मी म्हटलं : "मै आप की मुलाकात इन से करवाना चाहता हूँ. ये बिल गेट्स है."

"तो फिर आप कौन है?" असं विचारत त्यांनी माझी फिरकीच घेतली!

"जी, मेरा नाम डॉ. थोरात है. मैं रिझर्व्ह बँक में और 'नाबार्ड' में हुआ करता था."

"बहुत खूब, बहुत खूब...पहले क्यूँ नही बताया? कैसा चल रहा है रिझर्व्ह बैंक? आप पान का शौक फर्माते है?" प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी विचारलं.

"जी नही," मी ओशाळत पुन्हा म्हटलं : "ये जनाब बिल गेट्स है."

"रिझर्व्ह बैंक में काम करते है?" मॅनेजरसाहेबांनी विचारलं!

परिस्थिती झपाट्यानं हाताबाहेर चालली होती! बिल गेट्स यांचा 'स्व' त्या खेड्यातल्या कार्यक्रमात दुखावला गेल्याचं मला जाणवलं होतं. इथंही त्याचीच पुनरावृत्ती झाली तर आमच्या संस्थेला मदतीची अपेक्षा सोडावी लागणार अशी भीती मला वाटू लागली...

मॅनेजरमहोदयांच्या टेबलावरच्या कॉम्प्युटरकडे बघून मला अचानक एक कल्पना सुचली. मी म्हणालो : "आप के कॉम्प्युटर में जो सॉफ्टवेअर है ना, वो इन्हो ने बनाया है."

मॅनेजरसाहेबांच्या डोक्यात अजूनही प्रकाश पडत नव्हताच.

"तो बेचना चाहते है?" त्यांनी त्याच गुमानीत प्रश्न केला.

"काय म्हणत आहेत ते?" बिल गेट्स यांनी मला विचारलं.

"तुमच्यासारखी व्यक्ती भेटल्यामुळे त्यांना खूप आनंद झालाय," मी बिनदिक्कतपणे सांगितलं!

बिल गेट्स थोडेसे रिलॅक्स झाले.

"या सॉफ्टवेअरबद्दल त्यांचं काय मत आहे असं त्यांना विचारा," बिल गेट्स म्हणाले.

मी भाषांतर करून मॅनेजरना प्रश्न सांगितला. त्यावर त्यांनी काही क्षण विचार केला आणि खानदानी उर्दूत मॅनेजरसाहेब म्हणाले : "देखिए, बात कुछ ऐसी है कि ये तनिक इस्लो है. सुधारना पडेगा. रफ्तार बढानी पडेगी इस की..."

"ते काय म्हणत आहेत?" बिल गेट्स यांनी पुन्हा विचारलं.

प्रसंग बाका होता!

पण 'उद्दिष्टावरची नजर कधीही ढळू द्यायची नाही' हे तत्त्व मला माहीत होतं. बिल गेट्स यांच्या डोळ्यात रोखून बघत मी म्हणालो : "अभिनंदन! ते म्हणत आहेत की सॉफ्टवेअर अतिशय उत्तम आहे. इथं फारशी कनेक्टिव्हिटी नसतानाही ते विजेच्या वेगानं चालतंय."

बिल गेट्स यांच्या चेहऱ्यावर मंद स्मित झळकलं.

***

आम्ही निघालो. परतीच्या प्रवासात वातावरण बरंच निवळलं होतं. विमानतळावर पोचलो तेव्हा मला आणि राहुल यांना एका बाजूला घेऊन बिल गेट्स म्हणाले : "त्या महिलेनं तो प्रश्न विचारून मला धक्काच दिला; पण तिला अपेक्षित असलेलं शिक्षण तिच्या मुलाला मिळू शकेल का याची मला काळजी वाटतेय."

"का नाही मिळणार?" राहुल यांनी विचारलं.

"ते मिळावं असं तुम्हाला नि मला वाटतंय; पण तिथल्या परिस्थितीत ते शक्य होईल का?" बिल गेट्स यांनी शंका उपस्थित केली.

"का? भारत आहे म्हणून?" मी हस्तक्षेप करत म्हणालो.

"तसं नाही," बिल गेट्स म्हणाले : "आपण निसर्गावर मात केलीय हा माणसाचा फार मोठा भ्रम आहे. एका लहानशा विषाणूमुळे त्या निष्पाप मुलाचा जीव जाऊ शकतो."

ते ठामपणे म्हणाले : "जे मुलाला लागू होतं ते सगळ्या जगाला लागू होतं. जागतिक विनाशाबद्दलचं आपलं ज्ञान अणुस्फोटानंतर निर्माण झालेल्या धुळीच्या ढगावरच आधारित आहे अजून! म्हणून, आजवर आम्ही फक्त अणुबाँबला प्रतिरोध कसा करायचा यावरच उपाय शोधत बसलो; पण खरा धोका कुठून आहे याचा अंदाजच आपल्याला नाही."

"कुठून धोका आहे?" राहुल यांनी विचारलं.

"निसर्गाकडून. राक्षसी विषाणूकडून. सध्याच्या काळात जागतिक स्तरावर थैमान घालणारा एखादा विषाणू अवतरेल याच्यावर जगातल्या कोणत्याही देशांच्या सरकारचा विश्वासच नाही ही मोठ्या दुःखाची बाब आहे. मात्र, असला विषाणू अवतरू शकतो ही वस्तुस्थिती आहे. तो कमालीच्या वेगानं जगभरात पसरून मानवजातीचा फार मोठ्या प्रमाणावर संहार करू शकतो. कितीतरी देशांच्या नेत्यांच्या निदर्शनास मी हे आणलं आहे. सर्वजण 'हो' म्हणतात; पण करत मात्र कुणीच काही नाही."

मला वाटलं की ते त्या वेळी आमच्याशी केवळ बोलत नव्हते, तर दूरवर शून्यात बघत ते केवळ त्यांनाच दिसेल असं विनाशाचं चित्र पाहत होते.

ते पुढं म्हणाले : "याविषयीच्या संशोधनासाठी मी मदत करतोय; पण ती पुरेशी नाही. ती कधीही पुरेशी होऊ शकणार नाही...जगातले सगळे देश आपापल्या बजेटमधून या कामासाठी जोपर्यंत मोठी रक्कम बाजूला काढत नाहीत तोपर्यंत. मानवतेच्या सर्वनाशाला एक अणुबाँब नव्हे तर एक सूक्ष्म विषाणू पुरेसा आहे, हे जोपर्यंत जगाला पटत नाही तोपर्यंत हा धोका कायम राहणार आहे."

"हे घडेल असं तुम्हाला खरंच वाटतं का?" मी विचारलं.

"होय," ते गंभीरपणे म्हणाले : "कडेवर मूल घेऊन उभ्या असलेल्या महिलेची काळजी मला त्यामुळेच वाटतेय. मघापासून मी तिचाच विचार करतोय."

***

उड्डाणासाठी विमान सज्ज असल्याचं पायलटनं येऊन सांगितलं.

"ठीक आहे...आपल्याला जे शक्य आहे ते आपण थोडं तरी करू या," असं म्हणत बिल गेट्स उठले.

"इथं येऊन मला खूप आनंद झाला," असं म्हणत त्यांनी राहुल गांधी यांच्याकडे वळून गुड बाय केलं. जाताना मिष्किलपणे म्हणाले : "तुमच्या चीफ ऑफ स्टाफला सोडू नका."

***

काही वर्षांनी बिल गेट्स यांनी 'इबोला' या विषाणूच्या संदर्भातील 'टेड टॉक्स' भाषणात हीच भीती पुन्हा व्यक्त केली. विविध देशांच्या सरकारांनी हा धोका मान्य करून ही वस्तुस्थिती स्वीकारावी आणि तिचा मुकाबला करण्यासाठी युद्धपातळीवर तयारी करावी असंही आवाहन त्यांनी केलं.

बिल गेट्स यांच्या त्या दौऱ्याला आता एक दशक उलटून गेलं आहे.

आज एक विषाणू सगळ्या जगात थैमान घालत आहे.

या विषाणूनं हजारो जणांचे बळी घेतले आहेत आणि लाखो जणांना त्याची बाधा झाली आहे. आणखी किती जण या विषाणूच्या विळख्यात येतील याचा अंदाजच करता येत नाही. या साथीनं आता तिचं अत्युच्च शिखर गाठलंय का तेही अजून कळायला काही मार्ग नाही. शास्त्रज्ञ रात्रंदिवस काम करत आहेत; पण कोणतंही औषध दृष्टिपथात आलेलं नाही.

दरम्यानच्या काळात तेलाच्या किमतींनी नीचांक गाठला आहे आणि शेअर बाजार आणि इतर सगळे बाजार कोसळत आहेत. चीनमधले अनेक कारखाने पुन्हा सुरू होण्याच्या तयारीत आहेत असं ऐकतो; पण त्यांच्या मालाला मागणी कुठं आहे? मागणी नाही तोपर्यंत कारखाने कसे चालणार? कारखाने चालले नाहीत तर जागतिक अर्थव्यवस्थेचं काय होणार? आर्थिक विकास खुंटला की अनेक देशांत मंदीची लाट येईल असा अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. प्रोटेक्शनिझम डोकं वर काढत आहे. त्यातून लोकांची क्रयशक्ती कमी होईल आणि जागतिक

अर्थव्यवस्थेला पुन्हा एकदा खीळ बसेल. एक पाऊल पुढं जाऊन जर व्यापारावर निर्बंध घातले तर मंदी दीर्घ काळ टिकण्याची भीती आहे. या विषाणूवर औषध सापडेपर्यंत हीच स्थिती कायम राहणार आहे.

'कोविड-१९' या विषाणूला कसलंही बंधन नाही. जागतिक सीमांचं बंधन नाही, सामाजिक बंधन नाही, राजकीय पद्धती किंवा सांस्कृतिक मूल्ये यांची तमा तो बाळगत नाही. हिंदू किंवा मुस्लिम अथवा गरीब-श्रीमंत असा भेदभाव तो करत नाही. तो प्रत्येकावर सारख्याच कठोरपणे आघात करतो. त्यानं सगळं जग एका समान पातळीवर आणलं आहे.

हा विषाणू आता भारतात आलाच आहे. त्यामुळे आतापर्यंत काय घडलं यापेक्षा आपण आज त्याचा मुकाबला कसा करणार आहोत हे महत्त्वाचं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या पाहणीनुसार, बाधित व्यक्ती सुरुवातीला २.६ व्यक्तींमध्ये हा विषाणू पसरवते. पाच-सहा दिवसांत याची सुमारे दहा आवर्त होतात आणि सुमारे ३५०० लोकांना याची बाधा होते.

चीनपासून धडा घेऊन आपण संसर्गसाखळी वेळीच रोखण्यासाठी पावलं उचलली आहेतच. आता आपण धैर्यानं या स्थितीचा सामना केला पाहिजे. चीननं जेव्हा विलगीकरणाचे उपाय अवलंबिले तेव्हा आपण 'हुकूमशाहीचा अतिरेक' असं म्हणून त्याची संभावना केली; पण त्यांनी त्याचा पाठपुरावा करून या विषाणूवर काबू मिळवला. संचारबंदी आणि अन्य उपायांबरोबरच आपल्या सरकारनं लॉकडाऊनसारख्या उपायांचाही अवलंब केला आहे. धोका जर मोठा असेल तर त्यावरचा उपायही तितकाच कठोर असावा लागतो. लॉकडाऊनमुळे आपल्या स्वातंत्र्यावर काहीसा घाला घातला गेल्यासारखं आपल्याला वाटेल; पण सर्वांच्या सुरक्षेसाठी हे आपण सहन केलंच पाहिजे.

लॉकडाऊन हा योग्य उपाय आहे. आपण अधिकाऱ्यांना थोडी उसंत देणार आहोत आणि विषाणूचा प्रसार रोखणार आहोत. हे लॉकडाऊन आपण स्वयंस्फूर्तीनं स्वीकारलं पाहिजे. तसं ते आपण स्वीकारलं आहेच. स्वतःपेक्षा आपला देश मोठा आहे. आवश्यक असेल तेवढे दिवस स्वतःला घरात कोंडून घेण्याचं साहस, विवेक आणि क्षमता आमच्यात आहे हे जगाला दाखवून देण्याची हीच संधी आहे.

भारत या संकटावर मात करेल याविषयी माझ्या मनात कोणतीही शंका नाही; पण आपण एक सामाजिक कर्तव्य म्हणून स्वतःला इतरांपासून दूर ठेवलं तरच हे शक्य होईल.

७० वर्षांपूर्वी आपण आपली राज्यघटना संमत केली. आज या राज्यघटनेत एक दुरुस्ती करण्याची वेळ आली आहे.

'अमेरिकेनं तुमच्यासाठी काय केलं हे विचारण्यापेक्षा तुम्ही अमेरिकेसाठी काय करणार आहात ते सांगा' हे जे त्या देशाच्या एका नेत्याचं इतिहासप्रसिद्ध वाक्य आहे त्या वाक्यातला आशय आपल्याही या दुरुस्तीत यायला हवा. 'तुम्ही भारतासाठी काय करताय?' हा प्रश्न आज आपण स्वतःला विचारू या आणि त्याचं निःसंदिग्ध उत्तर जगाला देऊ या.

आपण नवं राष्ट्र असलो तरी आपली संस्कृती प्राचीन आहे. आपला प्रवास पाच हजार वर्षांपूर्वी सुरू झाला. यादरम्यान अनेक संकटं आली आणि गेली. आता हे नवं संकट आलं आहे; पण खात्री बाळगा, तेही जाईल. मुद्दा तो नाही. मुद्दा हा आहे की हे नवं संकट आपल्याला नैतिकदृष्ट्या सबळ बनवणार की दुर्बल?

प्रसिद्ध कवी बिस्मिल अज़ीमाबादी यांचं गाजलेलं स्वातंत्र्यगीत आठवण्याची आजची हीच वेळ आहे :

वक़्त आने पर बता देंगे तुझे, ऐ आसमाँ
हम अभी से क्या बताएँ, क्या हमारे दिल में है?

सरफ़रोशी की तमन्ना अब हमारे दिल में है
देखना है ज़ोर कितना बाज़ू-ए-क़ातिल में है...

Article written by Dr. Y. S. P. Thorat, Director General, Pravara Rural Education Society, Loni have been published in the Marathi newspaper Sakal (under Saptrang).

- Seventh article published on Sunday, 19th April 2020.

"हम जहां पहुंचे, कामयाब आये' (डॉ. यशवंत थोरात)

डॉ. यशवंत थोरात | रविवार, 19 एप्रिल 2020

A+ A-

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत 13 डिसेंबर 1971 ला पूर्व पाकिस्तानातल्या स्थितीबाबत वादळी चर्चा झाली. अमेरिकेनं युद्धबंदीचा आणि दोन्ही देशांनी सैन्य मागं घेण्याचा प्रस्ताव मांडला. रशियानं नकाराधिकार वापरून हा प्रस्ताव फेटाळला; पण भारताला स्पष्ट केलं, की या प्रश्नावर ते पुन्हा नकाराधिकार वापरणार नाहीत.





संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत 13 डिसेंबर 1971 ला पूर्व पाकिस्तानातल्या स्थितीबाबत वादळी चर्चा झाली. अमेरिकेनं युद्धबंदीचा आणि दोन्ही देशांनी सैन्य मागं घेण्याचा प्रस्ताव मांडला. रशियानं नकाराधिकार वापरून हा प्रस्ताव फेटाळला; पण भारताला स्पष्ट केलं, की या प्रश्नावर ते पुन्हा नकाराधिकार वापरणार नाहीत. एखाद्या झंझावातासारखी ही बातमी भारतावर येऊन आदळली. भारताच्या हातात काही नसताना युद्धबंदी स्वीकारावी लागण्याची भीती निर्माण झाली. वेळ अगदी थोडा उरला होता; पण आपलं दैव बलवत्तर होतं.

कार मुख्य प्रवेशद्वारातून पंजाब राजभवनात पोचली. एडीसीनं दरवाजा उघडला. "गुड मॉर्निंग सर, राज्यपाल महोदयांनी आपल्यासाठीच वेळ ठेवलाय,' असं म्हणत त्यानं आम्हाला आतल्या दालनाकडे नेलं. प्रथमदर्शनी मला ते एखाद्या निवृत्त सनदी अधिकाऱ्यासारखे वाटले; पण त्यांच्या पहिल्याच वाक्यानं त्यांच्यातल्या लष्करी अधिकाऱ्याची जाणीव स्पष्टपणे करून दिली.
""कम ऑन, यंग मॅन," म्हणत त्यांनी माझं स्वागत केलं.
""तुला यायला थोडा उशीर झाला, तुझ्या वडिलांना हे आवडलं नसतं," ते हसत म्हणाले.
ती अधिकृत भेट होती. पंजाबमधली शेतीची स्थिती, जमिनीतील पाण्याची खाली जाणारी पातळी, तांदूळ, गहू आणि मसूर यांच्या पीक पद्धतीतले बदल याविषयी आम्ही बोलत होतो. त्यांचं स्पष्ट म्हणणं होतं, की "पंजाबमधल्या शेतकऱ्याला गहू आणि तांदूळ यासाठी मिळणारी मदत जर कडधान्यासाठी देण्यात आली, तर ते पीक पद्धतीत बदल करायला तयार होतील; पण तुम्ही याची हमी देणार आहात का?' आम्ही बराचवेळ बोलत होतो. निघताना ते म्हणाले : ""रात्री भोजनासाठी इथंच या."
संध्याकाळी ते निवांत होते. माझ्या वडिलांच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या आणि जेवणानंतर त्या दिवसांच्या युद्धाविषयी बोलले, ज्यातून बांगलादेशची निर्मिती झाली.
त्यानंतर काही महिन्यांनी आम्ही साऊथ ब्लॉकच्या कॉरिडॉरमध्ये भेटलो. ते सुरक्षारक्षकांच्या गराड्यात होते; पण जवळ येताच क्षणभर थांबले. शुभेच्छा देत त्यांनी माझी चौकशी केली आणि नाबार्डकडून पंजाबला द्यावयाच्या मदतीची आठवण केली.
सन 2016 मध्ये त्यांच्या मृत्यूची बातमी मला समजली. मी शोक व्यक्त करणारं पत्र त्यांच्या कुटुंबीयांना लिहिलं. सन 1971 च्या युद्धाच्या त्यांनी सांगितलेल्या आठवणींची फाईल बंद केली.

ती फाईल तशीच बंद राहिली असती जर सन 1971च्या युद्धाचा विषय काढला गेला नसता. एका पार्टीत एका निवृत्त जनरलनी "लष्करप्रमुख जनरल सॅम माणेकशा नसते, तर हा विजय मिळालाच नसता' असे उद्‌गार काढले. तिथं असलेल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानं ते अमान्य केलं. "1971 विजयात लष्कराची भूमिका महत्त्वाची होती हे कुणीच नाकारू शकणार नाही; पण सगळं श्रेय फक्त लष्करालाच देणं कितपत योग्य आहे? त्यावेळच्या कठीण परिस्थितीत अतिशय चांगली कामगिरी बजावणाऱ्या राजकीय नेतृत्वाचं काय? मुक्तिवाहिनीला प्रशिक्षण देणाऱ्या आपल्या गुप्तचर संस्था, चीन आणि अमेरिका यांचं दडपण आणि धमक्यांना न जुमानता काम करणाऱ्या आपल्या परराष्ट्र खात्याचं काय? आणि जनरल्सबद्दल बोलायचं असेल, तर जनरल अरोरा, जनरल जेकब यांच्या कामगिरीचं काय?" अशी तावातावानं चर्चा सुरू होती. मी फक्त ऐकत होतो. काही वेळा ऐकणंच चांगलं असतं.

पार्टीहून परतताना उषा म्हणाली : ""आज तुम्ही नेहमीपेक्षा गप्प होता."
""मी गप्प नव्हतो, विचार करत होतो, की जेव्हा इतिहासकार एखाद्या गोष्टीचं श्रेय किंवा दोष देतात ते नेहमीच बरोबर असतं का?"
""तुम्ही जनरल माणेकशा यांच्याबद्दल बोलत आहात का?," तिनं विचारलं. ""नाही. ते त्यावेळी लष्करप्रमुख होते आणि त्यांचा गौरव होणं योग्यच आहे." ""मग तुम्हाला नेमकं काय सुचवायचंय?" ""काहीच नाही. सोडून दे. तो काही वर्षांपूर्वी सांगितलेला, फारसा पुरावा नसलेला किस्सा होता." ""मग त्याविषयी मला का सांगत नाही?"
मुंबईच्या ट्रॅफिकमधून आमची कार मार्ग काढत होती. मी जुन्या आठवणींची साखळी जोडली आणि सांगायला सुरुवात केली : ""हे सगळं एका वकिलामुळे सुरू झालं. सिरिल रॅडक्लिफ या ब्रिटिश वकिलानं फाळणीच्यावेळी नकाशावर भारत आणि पश्चिम पाकिस्तान आणि भारत व पूर्व पाकिस्तान यांच्या सीमारेषा निश्चित केल्या. इस्लाम धर्माव्यतिरिक्त या दोन्ही देशांत कसलंही साम्य नव्हतं. दोन्ही देश फक्त हवाई मार्गानं एकमेकांशी जोडलेले होते. पूर्व पाकिस्तानात डाव्या विचारांकडे झुकलेली संस्कृती होती आणि तिथं बंगाली भाषा बोलली जाई; पण शक्तिशाली जमीनदारी आणि उजव्या विचारसरणीमुळे पश्चिम पाकिस्तानातले पंजाबी स्वतःला खरे भूमिपुत्र आणि बंगाल्यांना उपरे मानत होते. धर्मगुरूंना वाटत होतं, की येणाऱ्या काळात, इस्लाम हा दोन्ही भागांना एकमेकांशी जोडून ठेवील. मात्र, समान धर्म हा मुस्लिम देशांना एकमेकांशी भांडण्यापासून रोखू शकत नाही असा इतिहास असल्याचं सीमेच्या दोन्ही बाजूंच्या शहाण्यासुरत्या लोकांचं मत होतं.

पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानात पहिल्यांदा बंगाली भाषेला कोणता दर्जा दिला पाहिजे यावरून मतभेद झाले. याबाबत इस्लामाबादनं संवेदनशील भूमिका घेतली असती, तर प्रकरण निवळलं असतं; पण तसं घडलं नाही. नंतर निवडणुका लांबवल्या गेल्या आणि जेव्हा याह्याखान यांनी निवडणुकांची तारीख जाहीर केली, तेव्हा त्यांचं अंकगणित कच्चं असल्यामुळे बेरजा चुकल्या. कारण पूर्व पाकिस्तानची लोकसंख्या पश्चिम पाकिस्तानच्या एकत्रित लोकसंख्येपेक्षा जास्त आहे, हे त्यांच्या लक्षात आलं नाही. शेवटी लोकसंख्याच महत्त्वाची ठरली. आवामी लीग प्रचंड बहुमतानं निवडून आली आणि पश्चिम पाकिस्तानला मोठा धक्का बसला.

तरीपण लोकमताचा आदर केला असता, तर देश वाचला असता; पण तसं व्हायचं नव्हतं. पूर्व पाकिस्तानातल्या बुद्धिवान बंगाल्यांना तुच्छ मानणाऱ्या पश्चिम पाकिस्तानींनी निवडणुकांचे निकाल बाजूला सारले, देशात मार्शल लॉ लागू केला आणि पूर्व पाकिस्तानातल्या बहुसंख्य नेत्याना तुरुंगात डांबलं. जनरल नियाझीना पूर्व पाकिस्तानमधल्या लष्कराचे कमांडर म्हणून नियुक्त केलं. ऑपरेशन सर्चलाईट मोहीम सुरू करण्यात आली. त्याच्या अंतर्गत पूर्व पाकिस्तानात हिंदूंच्या विरुद्ध दडपशाही, बलात्कार आणि कत्तलींचं सत्र सुरू झालं.

ही एक घोडचूक होती. हिंदू आणि बंगाली नागरिकांचा धर्म वेगळा असला, तरी समान संस्कृती, इतिहास आणि परंपरांमुळे ते एकमेकांशी जोडले गेले होते. लोकशाही पद्धती किंवा निवडणुकांचे निकाल नाकारणं वेगळं आणि पूर्व पाकिस्तानातल्या जनतेच्या बंगाली अस्तित्वावर अत्याचार करणं वेगळं. पूर्व पाकिस्तानातल्या लोकशाहीचं वय 24 वर्षांचं होतं. बंगाली असण्याचा अभिमान हा जनतेच्या इतिहासाचा भाग होता. परिणामार्थ पूर्व पाकिस्ताननं दडपशाहीच्या विरोधात बंड पुकारलं. त्यातून निर्वासितांचा प्रचंड ओघ सीमा ओलांडून भारतात यायला लागला.

भारताची इकडं आड तिकडं विहीर अशी स्थिती झाली. नागरिकांची उपासमार करून या निर्वासितांना पोसा किंवा युद्धाचा धोका पत्करून लष्करी कारवाई करा. सुरुवातीला भारताची प्रतिक्रिया सौम्य होती. भारताचे गुप्तहेर आणि पूर्व पाकिस्तानातून हद्दपार झालेले लष्करी अधिकारी यांनी निर्वासितांच्या छावण्यांमध्ये लढाईचं प्रशिक्षण द्यायला सुरुवातही केली.

3 डिसेंबर डिसेंबर 1971 रोजी पाकिस्तानच्या हवाईदलानं भारताच्या हवाईतळावर अचानक हल्ला केला. भारताला प्रत्युत्तर देणं भाग पडलं. ही झाली भारताची या युद्धाविषयीची बाजू.

""मग पाकिस्तानचीही काही बाजू होती का," उषानं विचारलं. मी म्हणालो. ""होय आहे ना! जुने आरोप. "भारतानं विश्वासघात केला', "पाकिस्तानातील राजवट अस्थिर करण्यासाठी भारतानं मुद्दाम पाकिस्तानच्या अंतर्गत बाबतीत ढवळाढवळ केली', "आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर पाकिस्तानविरुद्ध खोटा प्रचार केला, मुक्तिवाहिनीला जन्म, प्रशिक्षण आणि शस्त्रास्त्रं दिली' ही पाकिस्तानची बाजू."

""मग पुढं काय झालं?," तिनं विचारलं.

मी म्हणालो ः ""1971 मध्ये पूर्व पाकिस्तानात केलेली दडपशाही, भारतीय हवाईतळांवर केलेले हल्ले, त्यानंतर भारतानं केलेली लष्करी कारवाई आणि या सगळ्यातून झालेली बांगलादेशची निर्मिती. लोकांना माहीत नसलेली गोष्ट म्हणजे ही, की सुरुवातीला लष्कराच्या पूर्व भागाला युद्धाची जी योजना पाठवली होती त्यात पूर्व पाकिस्तानवर आक्रमक कारवाई करून चिटगॉंग आणि खुलना हे प्रांत जिंकायचे असं म्हटलं होतं; पण या योजनेवर दोन आक्षेप घेण्यात आले ः संयुक्त राष्ट्रसंघाकडून तातडीनं युद्धबंदी करण्याबाबत येणारं संभाव्य दडपण आणि चीनच्या हस्तक्षेपाची शक्यता. या योजनेअंतर्गत पूर्व पाकिस्तान जिंकता येईल याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये एकमत होतं; पण त्यासाठी जास्त दिवस लागण्याची शक्यता होती आणि आपल्या देशाकडे तेवढा वेळ नव्हता. जनरल जे. एफ. आर. जेकब, चीफ ऑफ जनरल स्टाफ, ईस्टर्न कमांड आणि अन्य अधिकाऱ्यांना वाटत होतं, की नियाझींची लष्करी पार्श्वभूमी लक्षात घेतली, तर शक्यता प्रत्येक शहराची मोर्चेबंदी करून ते लढवण्याची होती. त्यामुळे भारतीय फौजांचा पुढे जाण्याचा वेग कमी झाला असता. प्रत्येक शहर जिंकत बसण्यात खूप वेळ जाण्याची शक्यता होती.

त्यामुळे त्यांनी पर्यायी योजना सुचवली. याच्या अंतर्गत, शहरांना वळसा घालून, पर्यायी मार्गानं पुढे जायचं, पाकिस्तानी सैन्याची रसद तोडायची, त्यांचं दळणवळण उद्‌वस्त करायचे आणि थेट राजधानी ढाका ताब्यात घ्यायची. लष्कराच्या पूर्व विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल जगजितसिंग अरोरा यांनी जनरल जेकब यांच्या योजनेला हिरवा कंदिल दिला. भारतीय फौजा पाकिस्तानी फौजांना वळसा घालून आणि पाकिस्तानची दळणवळण यंत्रणा उद्‌वस्त करत पुढे गेल्या.

""13 डिसेंबर 1971 ला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत पूर्व पाकिस्तानातल्या स्थितीबाबत वादळी चर्चा झाली. अमेरिकेनं युद्धबंदीचा आणि दोन्ही देशांनी सैन्य मागं घेण्याचा प्रस्ताव मांडला. रशियानं नकाराधिकार वापरून हा प्रस्ताव फेटाळला; पण भारताला स्पष्ट केलं, की या प्रश्नावर ते पुन्हा नकाराधिकार वापरणार नाहीत. एखाद्या झंझावातासारखी ही बातमी भारतावर येऊन आदळली. भारताच्या हातात काही नसताना युद्धबंदी स्वीकारावी लागण्याची भीती निर्माण झाली. वेळ अगदी थोडा उरला होता; पण आपलं दैव बलवत्तर होतं.

""युद्धाच्या तेराव्या दिवशी म्हणजे 16 डिसेंबर 1971 रोजी, पाकिस्तानी सैन्याचे कमांडर जनरल नियाझी यांनी ढाका पडल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्देशानुसार युद्धबंदीच्या प्रस्तावाला मान्यता दर्शवली.

""दुसऱ्या दिवशी पूर्व विभागाचे प्रमुख जनरल जगजितसिंग अरोरा- क्वेट्टा इथं एकेकाळी त्यांचा वर्गमित्र असलेल्या- जनरल नियाझींकडून शरणागती स्वीकारायला ढाक्याला गेले. अरोरा तिथं पोचले, तेव्हा पाकिस्तानी सैन्यानं त्यांना मानवंदना दिली. It was a public surrender. तिथं काही अंतरावर एक टेबल आणि दोन खुर्च्या ठेवलेल्या होत्या. भोवती राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रकारांचा गराडा होता. अरोरा यांनी शरणागतीचा मजकूर लिहिलेला कागद नियाझींपुढे ठेवला. नियाझींचे डोळे अश्रूंनी डबडबले आणि त्यांनी काहीही न वाचताच त्यावर स्वाक्षरी केली. या घटनेच्या जगभर प्रसिद्धी मिळालेल्या छायाचित्रात खाली मान घातलेले नियाझी करारावर स्वाक्षरी करत आहेत आणि फेटा बांधलेले जनरल अरोरा निर्विकार चेहऱ्यानं शेजारी बसले आहेत असं दिसत होतं.

""हा एक ऐतिहासिक क्षण होता. भारतीय लष्करानं पाकिस्तानच्या 93 हजार सैनिकांची शरणागती स्वीकारली आणि साडेसात कोटी लोकांना स्वातंत्र्य दिलं. बांगलादेशचा जन्म झाला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींना लोकसभेत सदस्यांनी "खडी ताजीम' दिली. लष्करी बाजूनं विजयाचं श्रेय जनरल माणेकशा यांना देण्यात आलं आणि त्यांना फील्डमार्शल किताबानं गौरवण्यात आलं."

""मग इतिहासकार कधीकधी श्रेय किंवा अपश्रेय देण्याबाबत चुकतात या तुमच्या संशयाचं काय," उषानं विचारलं?

""ती एक अस्पष्ट गोष्ट आहे. अर्थात ती काही गोपनीय गोष्ट नाही. त्याबाबत चर्चा झालेली आहे. ती एका माहितीपटात अख्यायिका म्हणूनसुद्धा सांगितली गेली आहे; पण अधिकृतपणे तिला कोणी दुजोरा दिलेला नाही किंवा ती खरी असेल तर तिला द्यायला हवं तेवढं महत्त्व देण्यात आलेलं नाही. जेकब यांना परमविशिष्ट सेवा मेडल मिळालं; पण त्यांच्या मानपत्रात याचा विशिष्ट उल्लेख नव्हता. त्यांना लष्कराच्या पूर्व भागाचे कमांडर म्हणून बढती मिळाली आणि नंतर ते पंजाब आणि गोव्याचे राज्यपालही झाले. त्यांच्या अंत्यविधीला अनेक वरिष्ठ लष्करी आणि सनदी अधिकारी उपस्थित होते आणि बहुतेक सर्वांनी जेकब यांच्या 1971 मधल्या कामगिरीचा उल्लेख केला. मात्र, त्यांनी माझ्याजवळ जे बोलून दाखवलं होतं त्याचा उल्लेख कोणी केला नाही." उषा आता पुरती वैतागली होती. ""यशवंत, तुम्हाला शब्दांचं जाळं विणून इतरांना कोड्यात टाकण्याची फार वाईट सवय आहे. अर्धवट काहीतरी सांगून तुम्ही गप्प बसता. नीट सांगा, काय घडलं?"

""सोळा डिसेंबरला, युद्धात थोडी मरगळ आलेली असताना जेकब यांनी युद्धबंदीची चर्चा करण्यासाठी जनरल नियाझी यांची भेट घेण्याची परवानगी मागितली. आश्चर्य म्हणजे ते ढाक्याहून परतले ते नियाझींकडून संपूर्ण शरणागतीचा प्रस्ताव घेऊनच. पुढचा इतिहास सगळ्यांना माहीत आहे." ""पण नेमकं काय घडलं?," उषानं विचारलं.

""त्यातली गोष्ट हीच, की युद्धबंदी अचानक शरणागतीमध्ये कशी काय बदलली गेली? एक गोष्ट लक्षात घे. संयुक्त राष्ट्रसंघाचं अधिवेशन चालू होतं. दुसऱ्यांदा नकाराधिकार वापरणार नाही, असं रशियानं स्पष्ट केलं होतं. जेकब जेव्हा नियाझींना भेटायला गेले, तेव्हा स्थिती अतिशय नाजूक होती. युद्धबंदी झाली, तर आपल्या हाती काहीच लागणार नाही, ही खरी भीती होती. स्थिती वाईट होती."

""म्हणजे जेकब यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या देखरेखीखालील युद्धबंदीला संमती मिळवा एवढाच आदेश होता?"

""तेवढाच आदेश असावा; पण त्यांनी संपूर्ण शरणागती मिळवली."

""काहीतरी सांगू नका," उषा म्हणाली. ""ते बोलणी करायला गेले आणि त्यांना सांगितलं होतं त्या मर्यादेच्या बाहेर जाऊन अधिकार नसताना बोलले, हे कसं शक्य आहे?"

""त्यांनी मला काय सांगितलं ते क्षणभर विसर; पण या घटनेवर आधारीत "मुक्ती' या माहितीपटातही हेच म्हटलं आहे. ""काय म्हटलं आहे?" ""हेच की त्यांनी नियाझींना स्पष्ट सांगितलं, की पाकिस्तानकडे असलेला दारुगोळा आणि सैन्य पाहता ते दहा दिवसांपेक्षा जास्त तग धरू शकणार नाहीत- याची आमच्या गुप्तहेरखात्यानं आम्हाला पूर्ण कल्पना दिली आहे. पाकिस्तानकडची शेवटची गोळी संपली, की मग फक्त भारतीय लष्करच त्यांचं रक्षण करू शकेल. भारतानं हस्तक्षेप न करता फक्त एक पाऊल मागे घेतलं, तर पाकिस्तानी लष्कराच्या अत्याचारात जे होरपळले आहेत, ते मुक्तियोद्धे नियाझींचे हजारो सैनिक आणि प्रसंगी त्यांची बायकामुलं यांच्यावर प्रचंड सूड उगवतील."

""एवढ्यावर नियाझींनी जेकब यांचं ऐकलं?" ""हो." ""यशवंत, नियाझीसुद्धा प्रोफेशनल लष्करी अधिकारी होते. शरणागती पत्करल्यानं आपल्या देशाचा केवढा अपमान होईल, याची त्यांना खंत वाटली नाही का?," उषाचा रास्त प्रश्न होता. ""त्यांना तशी खंत वाटली. नियाझींची पहिली प्रतिक्रिया प्रक्षोभाची होती आणि त्यांनी हा प्रस्ताव सरळसरळ फेटाळला. मात्र, नंतर त्यांच्या लक्षात आलं स्थिती आता आपल्या हातातून गेली आहे. मग....मला वाटतं, त्यानी गंभीरपणे विचार केला असावा आणि अंतिमतः शरणागतीचा पर्याय स्वीकारला असावा."

""तुम्ही खूपच ताणत आहात. त्यावर विश्वास ठेवणं कठीण आहे," उषा म्हणाली. ""मी तुझं म्हणणं मान्य केलं असतं, जर नियाझींनी नंतर जेकब यांच्यावर ब्लॅकमेल करण्याचा जाहीर आरोप केला नसता तर. "भारत बॉबिंग करून पूर्व पाकिस्तानी सैन्याचा संहार करील अशी धमकी देऊन जेकब यांनी मला ब्लॅकमेल केलं,' असं त्यांनी म्हटलं होतं."

""ती पूर्णपणे वेगळी कहाणी आहे," उषा म्हणाली. ""दोन्हींची सरमिसळ करू नका. लष्कराचा कोणताही जनरल आपलं संपूर्ण करिअर पणाला लावून असं धाडस करील, असं वाटत नाही."

""मला ते माहीत नाही; पण त्यांनी आपल्या एडीसीला सांगितलं, की तो त्यांचा निर्णय होता आणि तो चुकला असता, तर युद्धानंतर कोर्ट मार्शलला सामोरं जाण्याची त्यांनी तयारी ठेवली होती."

""असं कोण म्हणतं?"

""युद्धानंतर तयार केलेल्या एका अधिकृत माहितीपटातही हेच म्हटलं होतं," मी म्हणालो. ती हसली आणि म्हणाली : ""तुमच्यासारख्या इतिहासाच्या गंभीर अभ्यासकानं माहितीपटातल्या एखाद्या वाक्यावर मला विश्वास ठेवायला सांगावं, याचं आश्चर्य वाटतं."

""तसं नाही. जेकब काहीतरी निश्चित आदेश घेऊन सोळा तारखेला नियाझींना भेटले होते ही वस्तुस्थिती आपल्याला माहीतच आहे. त्यांना विशेष सूचना दिल्या गेल्या होत्या हे नक्की. आता ते त्या सूचनांच्या मर्यादेतच राहिले, की त्यापुढे जाऊन त्यांनी काय बोलणी केली हे कुणाला माहीत नाही; पण हीदेखील वस्तुस्थिती आहे, की जेव्हा ढाका शहरातच पाकिस्तानचं 26 हजारांहून जास्त सैन्य होतं आणि त्या परिसरात भारतीय जवान फक्त तीन हजार होते. असं असतानादेखील नियाझी संपूर्ण शरणागतीसाठी तयार झाले.

""आणखी एक गोष्ट. युद्धानंतर काही दिवसांनी पाकिस्तानच्या नॅशनल डिफेन्स कॉलेजनं या युद्धाचा एक सर्वंकष अभ्यास केला. त्यात त्यांनी असा निष्कर्ष काढला, की भारतानं केलेल्या कारवाईच्या यशाचं खरं श्रेय जनरल जेकब यांनी केलेल्या तयारीला आणि त्यांच्या सैन्यानं केलेल्या अंमलबजावणीला द्यायला हवं."

""मला माहीत आहे, की गोष्ट सांगणाऱ्यांना धागेदोरे जुळवायला आवडतात; पण आपण काही काल्पनिक गोष्टीवर बोलत नाही," उषा म्हणाली.

गाडी आमच्या बंगल्याच्या गेटमधून आत प्रवेश करत होती. ""सोडून दे," मी म्हणालो. ""तेच योग्य होईल," असा टोमणा तिनं मारला. झोपताना माझं मलाच हसू आलं. त्या दिवशी जेकब यांची भेट झाली, तेव्हा मी त्यांना विचारलं होतं. ते असंच हसले आणि स्पष्टीकरण न देता "आपण भेटलो याचा मला आनंद आहे' असं म्हणत त्यांनी मला निरोप दिला. परमेश्वर कादंबरीकार असता, तर प्रत्येक माणसाच्या कथेचा शेवट त्यानं नीट ठरवला असता; पण तो कादंबरीकार नाही आणि काहीवेळा वास्तव हे अविश्वसनीय असतं. कुठल्याही तर्क किंवा नियमात न बसणारं.

कधीकधी मी एकटा असतो, तेव्हा माझं मन पन्नास वर्षं मागं जातं. हिवाळ्यातल्या एका थंड सकाळी दोन्ही सैन्यातले दोन सैनिक त्यांच्या तंबूत पत्ते खेळत बसले असतील. त्यावेळी त्यांच्या मनात काय चाललं असेल देव जाणे. तंबूच्या बाहेर दोन देशांचं आणि त्यांच्या सैन्याचं भवितव्य पणाला लागलं होतं, याची कल्पना तरी त्यांना होती का? पत्ते खेळताना एकमेकांच्या डोळ्यांत पाहताना दुसऱ्याच्या हातात कोणते पत्ते आहेत, याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला असेल का? मग खेळाच्या नियमाप्रमाणे जेकब यांनी नियाझींना त्यांचा डाव ओपन करायला सांगितलं... मग काय झालं? त्यावर नियाझींनी काय केलं? त्यांचा आत्मविश्वास का ढळला? ते घाबरले नसते आणि उलट "यू शो' म्हणाले असते, तर भारतीय जनरलनं काय केलं असतं? पत्ते फेकून डाव सोडला असता का? मग दोन्ही बाजूंनी पुन्हा तोफांचा भडिमार सुरू झाला असता का? जे देश साध्या क्रिकेट सामन्यालाही युद्धाचं स्वरूप देतात, त्यांनी सुरक्षा परिषदेचा आदेश कितपत जुमानला असता? मग बांगलादेशचा जन्म झाला असता का?

...तसं झालं असतं तर मग मी आज हे लिहिलं असतं का?

उषाचं म्हणणंच बरोबर होतं.... काही गोष्टी सोडून देणंच बरं असतं.

Index

Sr. No.	Name of Department	Page Number
1.	Activities at a glance for the academic year 2019 – 2020 till date	01 – 02
2.	Institutional Activities	03 - 06
3.	Mechanical Department	07 - 10
4.	Chemical Department	11
5.	Civil Department	12
6.	Computer Department	13 - 20
7.	Information Technology	21 - 28
8.	Electronics and Telecommunication Department	29
9.	Instrumentation and Control Department	30 - 32
10.	Electronics Department	33 - 35
11.	Training and Placement Department	36 - 37
12.	NSS Department	38 - 40
13.	Activities of APRIL 2020	41 - 43

ACTIVITIES AT A GLANCE FOR THE ACADEMIC YEAR 2019-2020 TILL DATE

Sr. No.	Activity Name	Mech	Chem	Civil	Comp	IT	E&TC	Instru	Elect	Total
1	Staff who undergone industrial training	08	02	-	-	-	-	-	-	10
2	Students undergone internship / industrial training	54	139	10	08	24	12	33	36	316
3	Staff who attended FDP	23	14	08	60	28	21	12	17	183
4	Staff who attended workshop / conference	23	13	12	07	08	02	11	06	82
5	Staff who published paper	02	04	01	-	-	05	11	02	25
6	No. of value added course conducted	02	01	01	02	01	-	-	-	07
7	No. of expert / guest lecture arranged	12	05	10	10	09	03	14	06	69
8	No. of workshop / seminar arranged in PREC	06	-	01	03	09	09	08	05	41
9	No. of conference arranged in PREC	-	-	-	-	-	-	-	-	-
10	No. of in house valued added course arranged in PREC	02	03	-	-	-	-	-	-	05

11	No. of FDP arranged in PREC	-	-	-	02	02	-	-	-	04
12	Achievements of staff members	02	02	01	05	07	01	01	01	20
13	Achievements of students	08	-	04	02	07	02	06	11	40
14	Educational / industrial visits	09	04	11	05	03	04	07	04	47
15	MOUs	11	09	09	12	10	06	24	08	89
16	Extra curricular activity performed by staff	07	04	02	38	37	-	05	-	93
17	Extra curricular activity performed by student	10	21	11	22	09	06	25	120	224
18	Student placed of 2018 – 2019 batch	37	40	29	48	03	13	21	18	209
19	Student placed of 2019 – 2020 batch	54	03	-	22	07	14	10	02	112
20	Any other program conducted	16	03	07	05	10	09	08	08	66
21	Faculty industry visit	03	03	06	12	19	02	10	16	71
22	Alumni visit	53	35	24	38	09	14	50	23	246
23	Expert lectures conducted by alumni	05	13	02	05	07	04	12	05	53

Institutional Activities

APRIL 2020/PREC/01, 02/04/2020, Article featured in Divya Marathi and Sarvamat:

दैनिक दिव्य मराठी

टीचर्स अकॅडमीने तयार केला अभ्यासक्रम • ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार

लॉकडाऊनमध्ये 'प्रवरा'चे २३ हजार विद्यार्थी घेताहेत 'इ-लर्निंगद्वारे शिक्षण

नवनाथ दिघे | शिर्डी

लॉकडाऊनच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या पुढील नवीन शैक्षणिक वर्षाचे नुकसान टाळण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील टीचर्स अकॅडमीने तयार केलेल्या अभ्यासक्रमाचा लाभ ई-लर्निंग सुविधेतून सुमारे २३ हजार विद्यार्थी घेत आहेत. ग्रामीण भागातील ई-लर्निंगच्या या व्यापक स्वरूपातील पहिल्या प्रयत्नामुळे विद्यार्थी पालकांना दिलासा मिळाला आहे. इतर शिक्षण संस्थांसाठीही ई-लर्निंग सुविधेचा हा ज्ञानयज्ञ विलक्षण प्रेरणादायी ठरला आहे.

कोरोनाच्या राष्ट्रीय संकटाचे सावट सर्वत्र गडद होत असताना प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने शैक्षणिक संकुलातील सर्व वर्गांचे कामकाज थांबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे घरी पोहचविण्याची व्यवस्था केली. त्याबरोबरीनेच विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेतील टीचर्स ट्रेनिंग अकॅडमीने जून २०२० पासून सुरु होणाऱ्या नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमाचा अंतर्भाव असलेली लिंक उपलब्ध करून दिली. त्या माध्यमातून पुढील नवीन शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासाचा एक चांगला प्रयोग 'स्टडी फ्रॉम होम'च्या संकल्पनेतून यशस्वी ठरला आहे.

संस्थेच्या प्रत्येक शाखेतील पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गनिहाय विषय शिक्षकांनी हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहेत. मागील पंधरा दिवसात संस्थेने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसारच या लिंकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत मार्गदर्शन केले जात आहे. बहुतांशी शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी या लिंकच्या माध्यमातून समूह चर्चा करुन विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन केल्याने पुढील शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासाचा उत्साह विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला. ज्या भागांमध्ये इंटरनेटची सुविधा नाही किंवा पालकांकडे अँन्ड्राईड मोबाईल नसल्याच्या अडचणी समोर आल्या, तिथे शिक्षकांना पाठविण्याचे नियोजन संस्था पातळीवर सुरु आहे.

माजी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या उपक्रमाबाबत पालक आणि विद्यार्थ्यांशी साधलेल्या पत्ररुपी संवादात सुध्दा प्रामुख्याने या संकटाच्या काळात थोडेही खचू नका, विचलित होवू नका, हा काळही आपल्या सर्वांच्या सामुदायिक प्रयत्नांतून निघून जाईल असा दिलासा देतानाच, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, म्हणून संस्थेने पुढील अभ्यासक्रमांच्या संदर्भात प्राधान्याने घेतलेल्या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद पालकांकडून, विद्यार्थ्यांकडून आणि शैक्षणिक क्षेत्रातून मिळाला असल्याचे समाधान व्यक्त केले. ई-लर्निंग सुविधेचा ग्रामीण भागातील व्यापक स्वरूपातील पहिला प्रयत्न इतरही शिक्षण संस्थासाठी प्रेरणादायी ठरला असून शिर्डी, राहाता आणि संगमनेर तालुक्यातील शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी शिक्षक व पालकांसाठी ही लिंक प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था उपलब्ध करून देणार आहे. त्यासाठी या संस्थांसमवेत संपर्क साधला असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

फक्त शिक्षणच नव्हे, परीक्षाही घेतल्या जाताहेत

ई-लर्निंगच्या प्रयोग यशस्वी करण्यासाठी संस्था पातळीवर अतिशय सूक्ष्म नियोजन केले. ९० वी आणि ९२ वी मध्ये प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना या माध्यमातून मार्गदर्शन केले जात आहे. तांत्रिक महाविद्यालयांमध्ये सुद्धा हाच प्रयोग आम्ही सुरु करुन ई-परिक्षा देखील घेतल्या जात आहेत. या संकल्पनेत पालकांना अजूनही काही अडचणी असतील तर संबंधित वर्ग शिक्षकांशी संपर्क आणि संवाद साधावा.

- **सुस्मिता विखे पाटील**, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था

ऑनलाइन प्रक्रियेबाबत पालकही सकारात्मक

या नवीन प्रयोगाबाबत पालकांनीही ऑनपेक्षा माध्यमातून आपल्या सकारात्मक प्रतिक्रिया वर्ग शिक्षकांकडे व्यक्त केल्या आहेत. या सुविधेबद्दल समाधान व्यक्त करतानाच विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मिळत असलेल्या होम वर्क, ऑनलाइन टेस्ट तसेच शिक्षकांकडूनच याबाबत मिळणारा प्रतिसाद हे पाहण्यासाठी विद्यार्थी आणि पालक हे दोघेही आता उत्सुक आहेत.

- **लक्ष्मण उगलमुगले**, पालक

'प्रवरे'च्या शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचली घरोघरी

ई-लर्निंग सुविधेचा ४५ हजार विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

प्रतिनिधी | शिर्डी

लॉकडाऊनमध्ये विद्यार्थ्यांचे नुकसाना टाळण्यासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या टिचर्स अॅकॅडमीने तयार केलेल्या अभ्यासक्रमाचा लाभ संस्थेतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील सुमारे २३ हजार विद्यार्थ्यांसह इतरही संस्थांमधील सुमारे २२ हजार विद्यार्थ्यांना झाला. ई लर्निंगचा नवा प्रवरा पॅटर्न ४५ हजार विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना संकटाच्या काळात दिलासा देणारा ठरला.

मागील शैक्षणिक वर्ष संपत आला असले, तरी परीक्षा कशा घ्यायच्या हा प्रश्न होताच. शासनाने याबाबत धोरण निश्चित केल्यानंतर विद्यार्थी आणि शिक्षकांचे परीक्षांचे टेन्शन कमी झाले असले, तरी जूनपासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात कशी करायची या प्रश्नाचे उतर शोधण्याची वेळ शिक्षण संस्थांसमोर होती. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने याबाबत अतिशय कमी दिवसांत निर्णय करून ई लर्निंगचा प्रयोग राबवण्याचा निर्णय घेतला. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सुस्मिता विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन प्रवरा टिचर्स अॅकॅडमीच्या माध्यमातून वर्गनिहाय अभ्यासाचा पॅटर्न तयार केला. शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे वर्गनिहाय व्हॉटसअॅप ग्रूप तयार करण्यात आले. दैनंदिन कामाची वेळ ठरवून ई लर्निंगची ज्ञानगंगा विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचली.

'वर्क फ्रॉम होम' या संकल्पनेतून रोज शाळेत भेटणारे शिक्षक विद्यार्थ्यांना ऑनलाइन भेटत असल्याचा उत्साह वेगळा होता. विषयनिहाय शिक्षणाचा परिपाठ सुरू झाला. होमवर्क मिळत गेला. पालकांसमोरच गृहपाठ मिळू लागल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे गांभीर्य पालकांनाही समजले. याचा सकारात्मक परिणाम विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांतील सुसंवादातून दिसून आला.

संस्थेचे अध्यक्ष आमदार राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली ई लर्निंग सुविधेच्या ग्रामीण भागातील पहिल्या प्रयोगाची यशस्वी सुरूवात झाली. या सुविधेचा लाभ त्यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेपुरता सिमीत न ठेवता राहाता, राहुरी, संगमनेर या तालुक्यातील शिक्षण संस्थांना करून दिला. गणेश विद्या प्रसारक संस्था, शिवाजी शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थांबरोबरच इतरही अन्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाची लिंक उपलब्ध करून देण्यात आली.

APRIL 2020/PREC/01, 02/04/2020, Subject wise Google Drive links were created for PREC E-Learning portal and all the faculty members had uploaded their notes, post and assignments:

APRIL 2020/PREC/02, 05/04/2020, Video conference with AICTE Chairman Mr. Saharabuddhe, Vice Chairman Mr. Pooniya regarding new internship policy:



APRIL 2020/PREC/03, 06/04/2020, Conduction of online Workshop on Virtual Lab by IT department:

- 53 students had participated.

APRIL 2020/PREC/04, 11/04/2020 to 16/04/2020, Faculty Development Program on Machine Learning via online mode using Google Classroom:
Dr. M. R. Bendre of Computer Engineering Department conducted it.
Total 80 Faculties (50 from PREC and 30 from Outside) have participated in the FDP.

APRIL 2020/PREC/05, 18/04/2020, Conducted online mock test were 95% students had attempted the exam:

APRIL 2020/PREC/06, 19/04/2020, Mr. Suraj Wani, alumnus Mechanical department, 2015 batch had shared his views and concern about the spread of Covid-19 and how can one protect against the deadly virus with the correspondent of Marathi newspaper Divya Marathi from Luxemburg:

दैनिक दिव्य मराठी
19-Apr-2020
औरंगाबाद जिल्हा Page 1

दिव्य मराठी विशेष • कन्नड येथील सूरज वाणी याने लक्झेम्बर्ग या देशातून साधला संवाद

कोरोनाला रोखण्यासाठी नियमाचे पालन करा

संतोष निकम | औराळा

कोरोनाच्या काळजीनं अवघे जग धास्तावले आहे. अशाच महाभयानक परिस्थितीत आपल्या देशातील नोकरी, शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या आपल्या माणसाच्या काळजीने मनात काहूर निर्माण होते म्हणून त्यांच्याशी संवाद साधावासा वाटला. फ्रान्स आणि जर्मनी या दोन्ही देशांच्या मध्ये ६ लाख लोकसंख्या असलेल्या लक्झेम्बर्ग या छोटाशा देशात नोकरीसाठी गेलेला कन्नड येथील सूरज राजेंद्र वाणी यांच्याशी व्हिडिओ कालद्वारे दिव्य मराठीचे प्रतिनिधी संतोष निकम यांनी संवाद साधला.

कोरोना व्हायरसने लक्झेम्बर्ग या ६ लाख लोकसंख्या असलेल्या देशात मोठ्या प्रमाणात थैमान घातले आहे. आजपर्यंत ६९ जणांचा मृत्यू झाला, तर ३४५० रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह असल्याने १३ मार्चपासून संपूर्ण देश लॉकडाऊन करण्यात आला आहे. दिवसेंदिवस परिस्थिती भयानक होत असल्याने हे लॉकडाऊन किती दिवसासाठी आहे, ते कधी संपेल ह्याचा कोणताही निर्णय अजून येथील देशाने घेतलेला नाही. लक्झेम्बर्ग येथील नागरिकांनी शासनाने, प्रशासनाने घालून दिलेल्या नियम व अटींचे येथील नागरिक अगदी काटेकोरपणे पालन करत आहेत. तुम्हाला कोणत्या कारणासाठी घराबाहेर पडायचे आहे. बाहेर पडणे खरच गरजेचे आहे का याची माहिती येथील स्थानिक प्रशासन कळवून रीतसर परवानगी घेऊनच तुम्ही बाहेर पडू शकता. कुठल्याही ठोस कारणाशिवाय बाहेर जाणे सध्या तरी शक्य नाही. आणि जर तसे करताना त्यांना कोणी दिसले तर त्याला ४० हजार रुपयांचा दंड ठोठावला जातो. भाजीपाला आणायला जरी जायचे असेल तरी परवानगी, आणि मास्क घालूनच बाहेर पडावे लागते. येथील शासनाने संपूर्ण लक्झेम्बर्ग देशातील नागरिकांना मास्क आणि सॅनिट्रायझर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोनाचे गांभीर्य येथील प्रत्येक नागरिकांना कळले असल्याने शासनाच्या प्रत्येक नियमाचे काटेकोरपणे येथील नागरिक पालन करीत आहेत. त्यामुळे कोरोनावर येथील नागरिक नक्कीच मात करतील यात शंका नाही. माझ्या सर्व भारतीयांना माझी हात जोडून कळकळीची विनंती आहे की इटली, जर्मनी, अमेरिका, फ्रान्स, लक्झेम्बर्ग हे देश आपल्यापेक्षा खूप प्रगत आहेत. त्यांच्याकडे चागंल्या प्रकारे आरोग्य सेवा आहे. त्या देशाने या कोरोना विषाणू समोर हात टेकले.

काळजी घेतल्यास कोरोणा संकटावर मात

भारतीयांनी सामाजिक अंतर, तोडाला मास्क, लॉकडाऊनच्या दिवसात घरात राहिले पाहिजे. जर महत्त्वाच्या कामासाठी बाहेर गेलात आणि आपल्या घरी परत आला तर ताबडतोब स्नान केले पाहिजे. हात स्वच्छ करा. बहुतेक वेळा साबण, पाणी किंवा सॅनिटायझरचा वापर केला नाही तर भयानक परिस्थितीला सामोरे जावे लागेल. अशी भावनिक हाक सूरज वाणी यांनी लक्झेम्बर्ग या देशातून दिली.

APRIL 2020/PREC/07, 27/04/2020, Padmashri Dr. Vitthalrao Vikhe Patil's 40th Death Anniversary:

APRIL 2020/PREC/08, 18/04/2020, Conducted online mock test were 95% students had attempted the exam:

Mechanical Engineering Department

APRIL 2020/MECH/01, 11/04/2020, Faculty Development Program:
Faculty members Mr. A. D. Dighe, Mr. M. B. Gulve, Ms. S. S. Gholap completed online FDP on "Machine Learning" organized by PREC, Loni from 11/04/2020 to 16/04/2020.



APRIL 2020/MECH/02, 16/04/2020, Online Training Program:
On "Additive Manufacturing Fundamentals Assessment" organized by Tata Technologies was completed by faculty member Mr. M. B. Gulve.

APRIL 2020/MECH/03, 19/04/2020, ELearning Program:
On "Bulk Material Handling" organized by Tata Steel was completed by faculty member Mr. M. B. Gulve.

APRIL 2020/MECH/04, 23/04/2020, Online Training Program:
On "Best Practice for 3D Printing Assessment" organized by Tata Technologies was completed by faculty member Mr. M. B. Gulve.

APRIL 2020/MECH/05, 25/04/2020, Spoken Tutorial Test:
On "Python 3.4.3" organized at RMD Sinhagad School of Engineering by the Spoken Tutorial Project, IIT Bombay was successfully completed by Mr. R. A. Parkhe.

APRIL 2020/MECH/06, 25/04/2020, Online Training Program:
On "3D Connexion with CATIA" organized by Tata Technologies was completed by faculty member Mr. M. B. Gulve.

Chemical Engineering Department

APRIL 2020/CHEM/01, 02/04/2020, Online MOOC Course Completed:
Mr. Divate Sachin B. had Participated and completed a Online MOOC course on Global warming from "The Open Learn University" UK.

OpenLearn Free learning from The Open University

The Open University

Statement of participation

Sachin Divate

has completed the free course including any mandatory tests for:

Global warming

This 5-hour free course explored the history of global warming, the impact of humans on global warming and models of climate change.

Issue date: 2 April 2020

www.open.edu/openlearn

This statement does not imply the award of credit points nor the conferment of a University Qualification.
